महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब (कनिष्ठ)
संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन आदेश क्रमांकः कृषिआ १०१९/प्र.क्र.७१/१६अे
मंत्रालय विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई - ३२.
तारीख: २२ जुलै, २०१९

वाचा:- समक्रमांक दि.१४ जून, २०१९ चे शासन आदेश

शासन आदेश :-

श्री.अजय हणमंत वगरे, मंडल कृषि अधिकारी, अनाळा ता.परांडा जि.उस्मानाबाद यांना संदर्भाधीन आदेशान्वये कृषि अधिकारी (बियाणे), कृषि आयुक्तालय (गुणनियंत्रण-७/८), पुणे या पदावर पदस्थापना देण्यात आलेली आहे. तथापि, सदर पद रिक्त नसल्याने त्यांना रिक्त पदी पदस्थापना देण्याची विनंती कृषि आयुक्तालयाने केली आहे. श्री.वगरे यांना मंडल कृषि अधिकारी, अनाळा ता.परांडा जि.उस्मानाबाद या पदावरुन दि.२१ जून, २०१९ रोजी कार्यमुक्त केल्यामुळे ते पदस्थापनेच्या प्रतिक्षेत होते. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ (४) (दोन) व ४ (५) मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीने श्री.वगरे यांना स्तंभ ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे पदस्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	पदस्थापना
१	२	३
१	श्री.अजय हणमंत वगरे, कृषि अधिकारी	कृषि अधिकारी (किटकनाशके), कृषि आयुक्तालय (गुणनियंत्रण-७/८), पुणे

२. श्री.वगरे, कृषि अधिकारी हे दि.२१.०६.२०१९ ते प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यंत प्रशासकीय कारणास्तव पदस्थापनेच्या प्रतिक्षेत होते. त्यामुळे त्यांचा दि.२१.०६.२०१९ ते प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यंत सक्तीचा प्रतीक्षाधीन कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ च्या नियम ९ (१४) (एफ) नुसार व शासन निर्णय वित्त विभाग दि.०२.०६.२००३ व दि.०३.०३.२०१६ मधील तरतुदीनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारान्वये मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी व तसा अहवाल आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत शासनास सादर करावा.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०७२२१२३०५१५४०१ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sugriv Sambhaji Dhapate

Digitally signed by Sugriv Sambhaji Dhapate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, serialNumber=fc102de27dc1b41e747ac6cbb491c4209459c3cf340720ea98fd1d95b19c9f65, cn=Sugriv Sambhaji Dhapate
Date: 2019.07.22 12:42:36 +05'30'

(सु.सं.धपाटे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)

प्रत,

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. सचिव (कृषि) यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) ½, महाराष्ट्र मुंबई / नागपूर.
५. कृषि सह संचालक (आस्थापना), कृषि आयुक्तालय, पुणे
६. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि), पुणे)
७. सर्व संबंधित अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि), पुणे)
८. निवड नस्ती/१६अे